# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/१०/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

## अवैध गांजाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कळमेश्वर :— दिनांक २८/१०/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेटोलींग करीत असता गुप्त बातमीदाराद्वारे माहीती मिळाली कि यातील **आरोपी नामे— नौशाद रशीद शेख वय ३५ वर्ष रा वार्ड क्र ०१ उपरवाही ता कळमेश्वर** हा अवैध गांजाची विक्री करित आहे. अशा माहिती वरून रेड कारवाई करून आरोपीचे घराची झडती घेण्याचे म्हटलेवरून त्यानी झडती घेण्यास नकार दिल्याने अधिक संशय झाल्याने आरोपीचे घराचे झडती घेतली असता फ्रिजमध्ये हिरव्या रंगाच्या कापडी थैलीमध्ये वेगवेगळया आकाराच्या प्लॅस्टीक पन्न्यामध्ये काहीतरी भरून असल्याचे दिसल्याने त्याची पाहणी केली असता एकुण १६ नग एकुण वजन १६३ ग्रॅम किंमती ३२६०/—रू चा माल लहान मोठे प्लॅस्टीकचे पॅकेट खोलुन पाहीले असता गुंगीजनक गांजा आढळुन आला. तसेच आरोपीताचे अंगझडती घेतली असता ०१ ओप्पो कंपनीचा अॅन्डरॉईड मोबाईल किंमती १०,००० रू व २०० रू नगदी असा एकुण १३,४६०/— रू चा माल मिळुन आला. सदर आरोपीविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम २०(ब)(ii) एनडीपीएस अॅक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनात पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, सपोनि वडडे, पोउपनि मनोज टिपले, सफौ सुनिल मिश्रा, पोहवा दिनेश गाडगे, पोअं विवेक गाडगे यांनी पार पाडली.

## गांजा सदृश्य वनस्पतीची लागवड करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे उमरेड:–** दिनांक २८/१०/२०२४ रोजी यातील **आरोपी नामे– लाला बकारामजी नौकरकर वय ६२ वर्ष रा. एकराजे हॉटेलचे समोर बायपास उमरेड जि. नागपुर** याने त्याच्या घराच्या स्लॅबवर अवैध्यरित्या गांजा सदृश्य वनस्पतीची लागवड केल्याची माहिती पोस्टे उमरेड येथील स्टाफ यांना मिळालेल्या खबरे वरुन यातील फिर्यादीने एकराजे हॉटैलचे समोर बायपास उमरेड येथे जाउन पाहणी केली असता गांजा सदृश्य वनस्पतीक लागवड केल्याचे दिसुन आल्याने यातील आरोपी नामे लाला बकारामजी नौकरकर वय ६२ वर्ष रा एकगजे हॉटेल समोर बायपास उमरेड याच्या ताब्यातुन दोना गांजा सदृश्य वनस्पती झाडाचे मुळासकट वनज ४५८४ ग्रॅम त्यापैकी दोन्ही झाडांचा तोडलेला हिरवा गज्ज ताजा ओला असलेला पाला व फुलबार एकुण वजन ३२७४ ग्रॅम किमती २६,१९२ रू. अवैधरित्या मिळुन आल्याने जप्त केले. आरोपीविरूद्ध पोस्टे उमरेड येथे कलम २० (ब), २०(ब)(१) एन.डी.पि.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्रीमती वृष्टी जैन यांचे मार्गदर्शनात पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोनि जळक व त्यांचा स्टाफ यांनी पार पडली.

## पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ संबधाने रुट मार्च

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी १७.३० वा. ते १९.०० वा. पर्यंत मा. श्री.प्रियेश महाजन सा. SDM रामटेक, मा. श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक, मा. तहसीलदार रामटेक तसेच रामटेक उपविभागातील ४ ठाणेदार तसेच इतर ११ अधिकारी ७० अंमलदार लाठी, ढाल तसेच हेल्मेट सह ७ पोलिस वाहन तसेच सोबत सीमा सुरक्षा बल चे असिस्टंट कमांडंट आणि सशस्त्र २० जवान यांचे उपस्थितीत सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ संबधाने रुट मार्च घेण्यात आला व गांधी चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे स्थानिक नागरीकांसोबत संवाद साधुन त्यांना निवडणुक संबधाने मार्गदर्शन करण्यात आले व त्यांना निवडणुक कशी शांततेत पार पडेल या बाबत चर्चा करण्यात आली. सदरचा रूट मार्च पोलीस स्टेशन रामटेक ते शितलामाता मंदीर, शास्त्री चौक, गांधी चौक व डाँ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते रामटेक पोलिस स्टेशन पर्यत घेण्यात आला. त्यामधे रूट वर गाडी मधून जाहीर करून सुद्धा नागरिकांना आचारसंहिताचे पालन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील या करीता मार्गदर्शन करण्यात आले. तसेच दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर